दूरध्वनी : २५३३१२११
२५३३१५९०

# ठाणे महानगरपालिका, ठाणे.

महानगरपालिका भवन, डॉ. अल्मेडा रोड, चंदनवाडी, पांचपाखाडी, ठाणे- ४०० ६०२.
THE MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF THANE

संदर्भ क्र./ठा.म.पा/शविवि/८९० दिनांक २५/ ५ /२०१८

प्रति,

1. The Indian Institute of Architects Thane Centre,
   Thane
2. Maharashtra Chapter of Housing Industry (MCHI),
   Thane

विषय:- आगामी पावसाळयात अपघात/दुर्घटना व नागरीकांना त्रास होवु नये म्हणुन उपाय योजना करणेबाबत.

संदर्भ:- मा.आयुक्त सो.यांचे अध्यक्षतेखाली झालेली बैठक

महोदय,

आगामी पावसाळयात आपत्कालीन परिस्थिती उद्भवू नये म्हणुन करावयाची कामे व आपत्कालीन परिस्थितीत करावयाची कार्यवाही याबाबत मा.आयुक्त सो. याचे अध्यक्षतेखाली दि. १७.०५.२०१८ रोजी बैठक झाली होती. सदर बैठकीत ठाणे महापालिका हद्दीत सुरू असलेल्या विकास कामांमुळे उद्भवू शकणारी आपत्कालीन परिस्थिती बाबतची चर्चा झाली. त्याअनुषंगाने पावसाळयात अपघात/ दुर्घटना व नागरीकांना त्रास होवु नये म्हणुन विकासकामाच्या कार्यस्थळी खालीलप्रमाणे उपाय योजना करणे आवश्यक आहे.

१. खोदाई केलेल्या मातीचा साठा भूखंडाच्या हद्दीजवळ करुन नये. जेणे करुन सदरची माती लगतच्या सार्वजनिक रस्तावर पसरुन चिखल होणार नाही.
२. नव्याने कोणतेही खोदकाम करु नये.
३. तळघर / पाया (footing) करिता खोदकाम केलेले असल्यास, खोदकाम लगतची जमीन ढासाळणार नाही यासाठी आवश्यक उपाय योजना उदा. shoring /strutring इ. कराव्यात
४. खोदकामाच्या ठिकाणी पाणी साठणार नाही याबाबत दक्षता घ्यावी. जेणे करुन साचलेल्या पाण्यामुळे डासांची उत्पत्ती होवून रोगराईचा प्रादुर्भाव होणार नाही.
५. खोदकाम केलेल्या भागात पत्र्याचे संरक्षण कवच उभारावे. जेणे करुन त्या ठिकाणी कोणीही प्रवेश करणार नाही.
६. भुखंडामधुन नाला/ गटारे असल्यास, पावसाळी कालवधीत नाल्यातील पाण्याचा प्रवाह सुरळीत राहण्यासाठी आवश्याकते नुसार वेळोवेळी नाल्याचे/ गटाराचे de-silting करावे.

तरी, आपल्या संस्थेच्या सभासदांना वरिल प्रमाणे खबरदारी घेण्याचे व उपाययोजना करण्याबाबत सुचना देण्यात याव्यात ही विनंती.

THE MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF THANE
महानगर पालिका

(राजन खांडपेकर)
उप नगर अभियंता,
शहर विकास विभाग,
ठाणे महानगरपालिका,ठाणे

प्रत - १. मा. आयुक्त सो यांचेकडे माहितीसाठी सविनय सादर
२. मा. सहायक संचालक नगर रचना यांचेकडे माहितीसाठी सविनय सादर

Scanned with CamScanner